aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE

## Gallery















aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE
















aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE




















4 CNX शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०१४ Special

# बालदिवसानिमित्त बालकांना तंत्रज्ञानात्मक भेट

## अँण्ड्रॉइड अँप : बालकांचा वेळ सत्कारणी लावण्याच्या उद्देशातून केले डेव्हलप

**सीएनएक्स प्रतिनिधी**
cnx@lokmat.com

**नाशिक, दि. १३ : आजची लहान मुलेही सतत मोबाइलवर गेम खेळण्यात व्यस्त असल्याचे दिसतात. त्यांच्या वयात आवश्यक असलेल्या ज्ञानापासून ते वंचित राहत असल्याने त्यांच्या वयाला अनुसरून आवश्यक असणाऱ्या गोष्टी त्यांना मिळाव्यात, यासाठी शहरातील पांडवलेणी परिसरात राहणारे अरेट टेक्नॉलॉजीचे संचालक आनंद शिरसाठ यांनी बालदिवसानिमित्त एक मोफत अँण्ड्रॉइड अँप तयार केले आहे.**

सध्याच्या बालकांचे बालपण हेदेखील तंत्रज्ञानाच्या अधीन झाल्याचे चित्र दिसते. केवळ गेम्स खेळण्यासाठी ते मोबाइलचा वापर तासन्‌तास करत असल्याचे दिसते. त्यांचा हा वेळ वाया न जाऊन सत्कारणी लागावा, यासाठी आनंद यांनी हे खास अँप तयार केले आहे.

- अँण्ड्रॉइड बालवाडी
- मराठी बालगीते
- माझा कट्टा
- मस्ट हॅव
- आय अँम पॉसिबल असे पाच अँप

त्यांनी बनविले आहेत.

### अँण्ड्रॉइड बालवाडी

मराठी व इंग्रजी बाराखडी, प्राणी, पक्षी, अंक, फुले, भाज्या, फळे याची माहिती उच्चार व चित्रांसहित या अँपवर देण्यात आली आहे. लहान मुलांना शिक्षणात आणखी गोडी निर्माण होण्यासाठी याचा फायदा होईल.

### मराठी बालगीते

यामध्ये विविध बालगीतांचा समावेश करण्यात आला आहे. लहान मुलांना या गीतांची खूप आवड असते. यातून त्यांना निसर्ग, प्राणी, पक्षी याचे आकलन लवकर होत असल्याने हे अँप मुलांबरोबरच त्यांच्या पालकांनाही आकर्षित करत आहे. जे गाणे सहजासहजी मिळत नाहीत, त्यांचा समावेशही या अँपमध्ये आहे.

### माझा कट्टा

शिवाजी महाराजांच्या काळातील माहिती, महाराजांच्या मावळ्यांचे पराक्रम, महाराष्ट्रातील ५४ गड-किल्ल्यांची माहिती, समाजसुधारक, स्वातंत्र्यवीर, संत, खेळाडू, साहित्यिक, शास्त्रज्ञ, उद्योजक याबद्दल माहिती या अँपवर मिळणार आहे. त्यांच्या वयात आवश्यक असणारी माहिती यातून बालकांना मिळणार आहे. या सर्वांची माहिती एकाच ठिकाणी देणारे माझा कट्टा हे पहिले अँप असल्याचा दावा आनंद यांनी व्यक्त केला आहे.

बालदिन विशेष

शिवाजी महाराज

- शिवाजी महाराज
- बाजीप्रभू देशपांडे
- बाजीराव पेशवे
- राजमाता जिजाबाई
- कान्होजी आंग्रे
- पावनखिंड
- प्रतापगडाची लढाई
- पुरंदराचा तह

### मस्ट हॅव

विविध दाखले, लायसन्स कसे, कुठे काढावे लागतात, त्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात, त्याची प्रक्रिया कशी असते, याबाबत विद्यार्थी व पालकांना जास्त माहिती उपलब्ध होत नाही, पण योग्य माहिती मिळवली तर हे कठीण कामही सोप्पं होऊन जाते. तसेच गावातील जमिनी, कर, कायदे, भूसंपादन इत्यादी विषयांशी निगडीत माहिती हवी असल्यास आपण तलाठी कार्यालयात जातो. तलाठी नोंदवहीत कोणकोणत्या विषयांची माहिती असते, याविषयी उपयुक्त माहिती यामध्ये मिळू शकेल.

### आय अम पॉसिबल

या अँपमध्ये यशस्वी झालेल्या व्यक्तींची माहिती, स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अनुभव, प्रेरणादायी कविता व विवेकानंद, अब्दुल कलाम, महात्मा गांधी, चर्चिल, नेल्सन मंडेला, स्टीव्ह जॉब, बिल गेट्स, सुधा मूर्ती इत्यादींचे संदेश मराठी इंग्रजी हिंदीमध्ये या अँपवर देण्यात आले आहे. अशी सर्वसमावेशक माहिती बालके, शालेय विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांसाठीही उपयुक्त अशी माहिती या अँप्सवर देण्यात आली आहे.

### वेळेचा सदुपयोग

आज लहान मुले मोबाइलचा वापर केवळ गेम्स खेळण्यासाठी करतात व वेळ वाया घालवतात. त्यांच्या यावेळाचा उपयोग चांगल्या कामासाठी व्हावा, या उद्देशाने मी हे अँप तयार केले आहे. सर्व बालकांना माहितीपूरक व आकर्षक वाटेल, असे हे अँप आहे. - आनंद शिरसाठ, अँप डेव्हलपर

# ‘चिमुरड्यांच्या ॲप्स’ला चांद्यापासून बांद्यापर्यंत डिमांड

## शिरसाठ यांचा दूरध्वनी दिवसभर खणखणला

**स बातमीचा परिणाम**

**सकाळ वृत्तसेवा**

इंदिरानगर, ता. १२ : ‘चिमुरड्यांसाठी आता पाच ॲप्स विकसित’ ही अरेट टेक्नॉलॉजीज्‌चे संचालक आनंद शिरसाठ यांच्या तंत्रज्ञान आविष्काराची बातमी आज ‘सकाळ’मध्ये प्रसिद्ध होताच भ्रमणध्वनी क्रमांकावर सायंकाळी राज्याच्या विविध भागांतून हजारो नागरिकांनी संपर्क साधत, हे ॲप्स डाउनलोड केले.

बालकांना बालदिनाची भेट म्हणून श्री. शिरसाठ यांनी ‘बालवाडी’, मराठी बालगीते, माझा कट्टा, आय ॲम पॉसिबल आणि मस्ट हॅव ही पाच ॲप्स तयार केली आहेत. कोणत्याही जाहिरातीविना ती मोफत उपलब्ध करून दिली असून, त्याद्वारे मुलांसाठी रंजक माहिती देणारे दालन खुले केले आहे. ‘सकाळ’मध्ये याबाबत सविस्तर वृत्त प्रसिद्ध होताच हे ॲप्स डाउनलोड करण्यासाठी ९५९५८४५०३९ या क्रमांकावर व्हॉट्सॲपद्वारे संदेश द्यावा, असे आवाहन करण्यात आले होते. शिरसाठ यांना सायंकाळपर्यंत नाशिकसह, पुणे, सातारा, धुळे, जळगाव आदी ठिकाणांहून तीन हजार ४७० जणांनी संदेश पाठवत संबंधित ॲप्सची लिंक देण्याची विनंती केली. सातशे सहा जणांनी प्रत्यक्ष संवाद साधत पसंतीची पावती दिली.

### प्रतिक्रिया...

**आनंद शिरसाठ** (संचालक, अरेट टेक्नॉलॉजीज्) : ‘सकाळ’मध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर दिवसभरात तीन वेळा मला माझा मोबाईल चार्ज करावा लागला. यातूनच किती मोठा प्रतिसाद मिळाला असेल, याचा अंदाज घेता येईल. ज्या भावनेतून ही ॲप्स विकसित केली होती, ती ‘सकाळ’मुळे सर्वदूर पोचली, याचा मोठा आनंद झाला आहे.

aspirelyfX
YOUR JOURNEY . OUR PROMISE

# चिमुरड्यांसाठी आता पाच ॲप्स विकसित

## आनंद शिरसाठ यांनी उलगडले बालविश्व

**राजेंद्र बच्छाव :**
सकाळ वृत्तसेवा



**आनंद शिरसाठ**



नाशिक, ता. ११ : चौदा नोव्हेंबरला खास बाल दिनानिमित्त बालमित्रांना भेट म्हणून पांडवलेणी येथील अरेट टेक्नॉलॉजीज्चे संचालक आनंद शिरसाठ यांनी खास बालकांसाठी अगदी मोफत उपलब्ध असणारे पाच अँड्रॉईड ॲप्स विकसित केले आहेत. विशेष म्हणजे, बालकांना निखळ आनंद मिळावा यासाठी त्यात कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता कंपनीचा होणारा फायदादेखील टाळला आहे. दोन दिवसांत सुमारे दोन हजार युजर्सनी हे ॲप डाउनलोड केले आहे, हे विशेष!

याबाबत माहिती देताना श्री. शिरसाठ यांनी सांगितले, की सपकाळ नॉलेज हबमध्ये संगणक शाखेत अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच मुलांना गेम्स खेळण्यापासून वंचित करण्यासाठी काहीतरी आनंददायी ॲप तयार करण्याचा संकल्प केला होता. तीन महिन्यांपासून यावर काम सुरू होते. चेतन बराटे आणि गौरव पाटील यांच्या मदतीने सखोल माहिती घेत अँड्रॉईड बालवाडी, मराठी बालगीते, माझा कट्टा, आय ॲम पॉसिबल आणि मस्ट हॅव ही पाच ॲप्स विकसित केली आहेत. यात बालवाडी ॲप्समध्ये लहानग्यांसाठी उपयुक्त असणारे मराठी आणि इंग्रजी बाराखडी, अंकओळख, प्राणी आणि पक्ष्यांची चित्रे, त्यांचे आवाज याचे मोठे कलेक्शन आहे. बालगीतांमध्ये लोकप्रिय असलेल्या अठरा बालगीतांचा समावेश आहे. 'नाच रे मोरा'पासून तर 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला' आदी गीतांचा यात समावेश करण्यात आला आहे.

'माझा कट्टा' हे ॲप्स तर माहितीचा खजिनाच आहे. यात महाराष्ट्रातील ५४ किल्ल्यांची माहिती छायाचित्रांसह उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोबत छत्रपती शिवरायांचा इतिहासही येथे आहे. समाजसुधारक, स्वातंत्र्यवीर, विविध खेळांतील सर्वोत्कृष्ट खेळाडूंची माहिती या ॲप्समध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. आय ॲम पॉसिबल ॲप्समध्ये विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले शास्त्रज्ञ, आयआयटीचे यशवंत, त्यांच्याबाबत असलेली माहिती, त्यांचे प्रसिद्ध विचार आदी बाबी घेण्यात आल्या आहेत. इन्फोसिससारख्या मोठ्या कंपनीच्या यशाची पताका कशी फडकली, याची माहिती

पान ८ वर ▶

YOUR JOURNEY . OUR PROMISE

# चिमुरड्यांसाठी इन्फर्मेटव्ह ॲप्स

नाशिक टाइम्स टीम

हल्ली घराघरात लहानग्यांच्या हातात आई-बाबांचे फोन आपल्याला दिसतात. 'काय करतोय विचारले' तर 'गेम खेळतोय' असे उत्तर आपल्या कानावर अनेकदा येते. त्यामुळेच आता मोबाइल यांच्या हातात द्यावा की नाही हा मोठा प्रश्न पालकांना पडतो. गेमव्यतिरिक्त मुलांना मोबाइलमधून माहिती मिळावी त्यांना सामान्य ज्ञान मिळावे यासाठी नाशिकमधील आनंद शिरसाठ या तरुणाने नवीन ॲप्स तयार केले आहेत.

माझा कट्टा, बालगीते, आय ॲम पॉसिबल, फाइंड अस,मस्ट हॅव ही सर्व माहिती देणारी मुलांची करमणूक करणारी पाच ॲप्स या तरुणाने तीन महिन्यात तयार केली आहेत. या ॲप्समधून पहिली ते दहावीत शिकणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांना खूप मदत होणार आहे. या सर्व ॲप्समध्ये विद्यार्थ्यांना प्रत्येक क्षेत्राची माहिती उपलब्ध असून या माध्यमातून त्यांचा वाया जाणारा वेळही वाचणार आहे.




बालगीते या ॲपमध्ये महाराष्ट्रातील कवी कुसुमाग्रज, स्वातंत्र्यवीर सावरकर तसेच प्रोत्साहन देणाऱ्या कविता आणि बालगीते, स्फुरणगीतांचा समावेश करण्यात आला आहे. याचबरोबर ऐकण्यासोबत वाचण्याचाही आनंद मुलांना यामधून घेता येणार आहे. माझा कट्टा या ॲपच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गड, किल्ले, समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक, प्रशासकीय अधिकाऱ्यांची माहिती आणि इतिहास वाचायला मिळणार आहे. साहित्यिक, खेळाडू या सर्वांची माहिती या ॲपमध्ये सामविष्ट करण्यात आली आहे.

शालेय विद्यार्थ्यांना आपला इतिहास आणि सामान्य ज्ञान नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मिळावे यासाठी या ॲप्सची निर्मिती करण्यात आली आहे. आय ॲम पॉसिबल या ॲपमध्ये जगभरातील यशस्वी व्यक्तींचा संघर्षप्रवास वर्णन करण्यात आला आहे. यामध्ये बिल गेट्स, सत्या नाडेला, सुधा मुर्ती यांसारख्या व्यक्तींची माहिती मुलांना वाचायला मिळणार आहे. तसेच अँड्रॉइड बालवाडी यामध्ये अंकलिपी आणि आपल्या आसपास असणाऱ्या वस्तुंची ओळख विद्यार्थ्यांना होणार असून यामध्ये वाचन आणि श्रवण या दोन्हींचा फायदा घेता येतो. मराठी आणि इंग्लिंग या दोनही भाषांमध्ये ही माहिती उपलब्ध आहे. बालदिनाच्या निमित्ताने चिमुरड्यांसाठी एक उत्तम भेट यानिमित्ताने मिळाली आहे. गुगल सर्च केल्यावर किंवा प्ले स्टोरमध्ये हे ॲप्स डाऊनलोड करता येणार आहे.



**शालेय विद्यार्थ्यांना आणि पालकांना या ॲप्सची मोठी मदत होणार आहे. अगदी चालता बोलता मोबाइलवर सामान्यज्ञान आणि इतिहास जाणून घेता येणार आहे.**

आनंद शिरसाठ, ॲप डेव्हलपर

Indiatimes | The Times of India | The Economic Times | More
Sign In | Like 6.9m | Follow 4.75M followers | YouTube 22K

THE TIMES OF INDIA Nashik

The Times of India | Search
Advanced Search »
Home | City | Nashik | Crime | Civic Issues | Politics | Schools & Colleges | More Cities | Buy@Amazon.in
You are here: Home » City » Nashik

## City youths experiment with technology to create apps

Himanshu Nitnaware, TNN | May 3, 2015, 02.18PM IST

Like | Share 2 | Tweet 1 | g+1 0 | in Share

NASHIK: In a first, a city youth has developed a Marathi crossword online game for enthusiasts. There are more like him dabbling with technology to develop innovative mobile applications, making routine work easier and better.

Manas Gajre has founded a gaming company; he, along with his teammates, came up with the idea to develop a Marathi crossword. "The Marathi crossword usually appears in newspapers. The word puzzle used to be very popular and people would spend hours solving the puzzle during their leisure time. However, with time, the appeal for the crossword has dwindled and the newspapers too have stopped carrying them," he said.

Gajre said the attraction of solving the crossword too has reduced among the readers. So Gajre decided to create an online version of the puzzle. Gajre said the game has 50 levels in all and the difficulty level increases after each level is cleared.

Like Gajre, there are others indulging in creation of more such mobile apps through experimentation.


Anand Shirsath is another youth who has developed a number of applications catering to children like 'Balgeet', which allows them to get hands on access to their favourite poems and songs with lyrics and 'Android-Balwadi', which teaches alphabets, colours and numbers to pre-schoolers.

Parag, yet another city based entrepreneur, has developed an application for personal use. "I have created an app that allows controlling lighting conditions at home. The app is connected to the electrical circuit and operates on Bluetooth," he adds.

BUILD THE FUTURE
SCHACK INSTITUTE OF REAL ESTATE
NYU | SCHOOL OF PROFESSIONAL STUDIES
FIND YOUR FUTURE SELF >> APPLY NOW

COMPLETED
2ND TEST
cricbuzz
SL 315 & 153/3
26.3 Ov
PAK 138 & 329
Sri Lanka won by 7 wkts

FROM AROUND THE WEB


How much does cloud computing actually save you? Find out.
Intel


Make-in-India: Lessons from China
CNBC

**सुविधा** | आनंद शिरसाठने तयार केले ॲण्ड्रॉइड ॲप; गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध


# एका क्लिकवर प्रवेशप्रक्रिया

## विद्यार्थी अन् पालकांना मिळणार दिलासा

**प्रतिनिधी | नाशिक**

विद्यार्थ्यांची आता पुढील प्रवेशप्रक्रियांसाठी धावपळ सुरू झाली आहे. या प्रवेशप्रक्रियांची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. आनंद शिरसाठ या युवकाने क्लिक फॉर ॲडमिशन नावाचे ॲप तयार केले आहे. क्लिक फॉर ॲडमिशन हे इंजिनिअरिंग, फार्मसी, डी. फार्मसी, डिप्लोमा तसेच, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ॲप ठरणार आहे.

विद्यार्थी आणि पालकांना सहसा प्रवेशप्रक्रियेची माहिती कॉलेजमध्ये जाऊन ब्रोशर्स मिळवून घ्यावी लागते. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून त्यांना अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए यांसारख्या महत्त्वाच्या अभ्यासक्रमांसाठी फक्त एका क्लिकवर वेगवेगळ्या १४ विद्यापीठांची माहिती उपलब्ध होणार आहे. या विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांची माहिती, त्या महाविद्यालयांचे जुने कटऑफदेखील या ॲपमध्ये पहायला मिळतात. यातही प्रामुख्याने सर्व महाविद्यालयांची माहिती विद्यापीठनिहाय तसेच जिल्ह्यांनुसार विभागण्यात आल्याने सगळ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. यामध्ये ३६ जिल्ह्यातील महाविद्यालयांचा समावेश होतो.




### कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत...

- महाविद्यालयांचा कोड, नाव, विभाग, फोटो सगळी माहिती आहे.
- कोणते अभ्यासक्रम उपलब्ध आहेत, त्याच्या जागा किती आहेत.
- संस्थेविषयी माहिती तसेच, संस्थाचालकांविषयी माहितीदेखील या ॲपमध्ये देण्यात आली आहे.
- प्रवेशासंदर्भात महाविद्यालयांशी संपर्क करण्यासाठी पत्ता, दूरध्वनी क्रमांक व वेबसाइट देण्यात आली आहे.
- मागील वर्षीचा कटऑफ आणि कॅपराउंड्सबद्दलदेखील या ॲप्लिकेशनमध्ये माहिती देण्यात आली आहे.
- सुविधा कुठल्या आहेत त्याची संपूर्ण माहिती शुल्कासह दिली आहे.
- विद्यार्थ्यांना आवडलेल्या महाविद्यालयांसाठी या ॲपवर 'फेवरेट' नावाचा ऑप्शनही देण्यात आलेला आहे.




### कसे शोधाल?

ॲण्ड्रॉइड प्ले स्टोअरवर तुम्ही क्लिक फॉर ॲडमिशन टाइप केल्यास या ॲपचा ऑप्शन ओपन होतो. त्याशिवाय www.clickforadmission.in या लिंकवर क्लिक केल्यास हे ॲप्लिकेशन उपलब्ध होईल.

### डिजिटल इंडिया कन्सेप्टकडून प्रेरणा



पंतप्रधानांनी सांगितलेल्या 'डिजिटल इंडिया' या संकल्पनेकडून प्रेरणा घेऊन आजपर्यंत जी माहिती फक्त पेपरवर उपलब्ध होती, ती आता डिजिटलाइज स्वरूपात पहायला मिळणार आहे. मुलांना प्रेरणा मिळावी, म्हणून यामध्ये काही मोटिव्हेशनल गोष्टीदेखील टाकण्यात आल्या आहेत. घरबसल्या मुलांना आपल्या करिअरची पुढील दिशा ठरवता यावी आणि त्यासाठी पायपीट करावी लागू नये, यासाठी हे विशिष्ट ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. - **आनंद शिरसाठ, अरेट टेक्नोलॉजी**

या ॲप्लिकेशनचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हे ॲप्लिकेशन फक्त ॲण्ड्रॉइड वापरणाऱ्यांसाठीच नाही, तर इंटरनेट ॲप्लिकेशन वेबपोर्टलद्वारे कॉम्प्युटरवर वापरणाऱ्यांनादेखील हे ॲप्लिकेशन सहज उपलब्ध होणार आहे. तसेच, साध्या मोबाइलवर इंटरनेट उपलब्ध असल्यास हे ॲप वापरता येऊ शकते.







▶▶ **नाशिक टाइम्स टीम**

# पर्याय क्लिक फॉर ॲडमिशनचा

शाळा, कॉलेजचे रिझल्ट लागले की, विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना टेन्शन येतं ते म्हणजे विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचं. कोणत्या कॉलेजला ॲडमिशन घ्यायचे, कोणती शाखा निवडायची याचा योग्य विचार करुन निर्णय घेण्यात अनेकांची तारांबळ उडताना दिसते. अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून, यासाठी नाशिकच्या आनंद शिरसाठ यांनी 'क्लिक फॉर ॲडमिशन' या ॲपची निर्मिती केली आहे.

ॲडमिशनची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आदींची सखोल माहिती या ॲपमधून देण्यात आली आहे. अकरावी, डिप्लोमा, इंजिनीअरिंग, फार्मसी अशा सर्व शाखांची माहिती, त्यासंबंधित महाराष्ट्रातील सर्व कॉलेजेसची सखोल माहितीचा समावेश या ॲपमध्ये करण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडिया या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन सुधारित पद्धतीने या ॲपची निर्मिती आनंद यांनी केली आहे. या कॉलेजेसची माहिती जिल्ह्यानुसार विभागलेली असल्यामुळे हे ॲप वापरकर्त्यांसाठी आणखी सोपे झाले आहे. महाराष्ट्रातील इंजिनीअरिंग, फार्मसीचे चौदा विद्यापीठांअंतर्गत असलेल्या कॉलेजची माहिती, डिप्लोमा व फार्मसीच्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील कॉलेजची माहिती यात देण्यात आली आहे. अशा एकूण १५०० कॉलेजेसची माहिती या ॲपच्या माध्यमातून मिळू शकणार आहे. प्रवेशाच्यावेळी अनेकांचा कागदपत्रांविषयी उडणारा गोंधळ टाळण्यासाठी कोणत्या अभ्यासक्रमांसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक असतात याची माहिती या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त बाबा आमटे, अमिताभ बच्चन, धीरुभाई अंबानी, सुधा मूर्ती, सुनील खांडबहाले, बिल गेट्स आदींचा जीवनप्रवास विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी या ॲपमधून उलगडून दाखवण्यात आला आहे. तसेच हलाखीच्या परिस्थितीवर मात करुन यश मिळविलेल्या आयएएस व आयपीएस झालेल्यांबद्दल माहिती विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरावी, यासाठी देण्यात आली आहे. करिअर या विभागात कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांबरोबरच इंग्रजी, लोकसेवा आयोगाच्या परीक्षा यांविषयी माहिती देण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रवेश प्रक्रियेबद्दल बातम्या, ताजी माहितीही यांत देण्यात आली आहे. विशेष म्हणजे ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही त्यांच्यासाठी वेब पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. www.clickforadmission.in या वेबसाईटवर ही माहिती मिळू शकणार आहे.




▶ **संस्थेविषयी माहिती**

- मागील वर्षीच्या कॅप राऊंड व कटऑफ लिस्टबद्दल माहिती.
- कॉलेजमधील सुविधा
- निवडक कॉलेजची स्वतंत्र लिस्ट करण्याची सुविधा




▶ **समाविष्ट माहिती**

- कॉलेजबद्दल संपूर्ण माहिती, संपर्क नंबर, पत्ता, वेबसाईट, फोटो, कोड नंबर आदी.
- कॉलेजमधील विभाग, कोणकोणते कोर्स उपलब्ध आहेत त्याचबरोबर त्यासाठी किती जागा आहेत.



❝ हे ॲप तयार करण्याच्या प्रक्रियेला साडेचार महिने लागले. विद्यार्थी व पालकांना ॲडमिशन दरम्यान येणाऱ्या अडचणी टाळता येतील.

आनंद शिरसाठ, ॲप डेव्हलपर

aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE







क्लिक फॉर ॲडमिशन नावानं मोबाईल ॲप
नाशिक
दूधाच्या 18 कॅनसह भेसळीचे साहित्य जप्त
ठाणे
व्हॉट्स ॲपवर टाकण्याची धमकी; मोटरसायकल


आनंद शिरसाठ, ॲप डेव्हलपर
ABP
माझा
भरारी
www.abpmajha.in

aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE

# Admission info at click of a button

Times News Network

**Nashik:** As admission time draws closer, the one thing students and their parents are losing sleep over is getting accurate information on the types of courses and colleges to apply for and the processes for getting enrolled. But coming to their rescue is a youth from Nashik, **Anand Shirsath**, a city-based software developer, who has prepared a website — clickforadmission.in — that provides comprehensive information about the availability of seats in colleges (district-wise), documents required for the admission process and career guidance.



"In today's digital world where the youth go online to obtain information on their careers and admission processes, we have launched an application that will provide all the information needed to apply for colleges in one place. All you have to do is just click on the website from your laptop or smart phone and you will get detailed information of the colleges — both district-wise and career-wise," Shirsath said.

**SUNDAY** *Feature*

The site also comes with a login facility through which every individual can register themselves and store information for personal use. "The login facility helps the individual to prioritise the search and refer to the information saved whenever they log in the next time around. Be it engineering, pharmacy, arts, MBA, company secretary or even a process related to the National Defence Academy (NDA) — information of everything is available on the website," he added.

Information regarding the colleges involves details of the courses, their fee structure, admission cut offs last year and the people who run the organizations. The website allows the students to seek information on the colleges, district wise. "Information on higher secondary schools — Class XI and XII — is being processed and uploaded as and when available. It is difficult to obtain the entire information, but we are committed to presenting the maximum information for the students across all the districts at the earliest. It will take a week's time at the most before it is completed," he said.

He further said, "The purpose of bringing all the information together on a single website is helping students in their struggle to get a better career for themselves. There are absolutely no restrictions on the use of the application and the registration is free of cost."

Motivational blogs, like stories of Baba Amte, Sudha Murthy, Amitabh Bachchan, Bill Gates, Sunil Khandbahale and other famous personalities have also been added in the website for students' reference.


लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे: १२+४+१६ = ३२, किंमत: ₹ ४.००

मुंबई, रविवार, दि. १४ जून २०१५



# ॲडमिशनच्या गोंधळाला करा बाय बाय!



टेकमंत्रा - तुषार भामरे

दहावी आणि बारावीच्या निकालानंतर कोणते क्षेत्र निवडावे याबाबत विद्यार्थी मित्रांमध्ये कन्फ्युजनचं वातावरण असतं. मग घरातल्या चर्चा, वेगवेगळे सेमिनार अटेंड करणं, इंटरनेटवर सर्च करणं असे विविध पर्याय पडताळून पाहिले जातात. सध्या इंटरनेटमुळे कोणत्याही महाविद्यालयाची माहिती एका क्लिकसरशी उपलब्ध होत असली तरी महाविद्यालयांची एकगठ्ठा माहिती मिळणं मुश्कीलच. ठरावीक महाविद्यालयाची माहिती मिळवल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेला सामोरं जावं लागतं. मग सुरू होतो कागदपत्रांचा सिलसिला... या सर्व प्रक्रियेत अगदी वेबसाईट्स शोधण्यापासून ते कागदपत्रे, प्रमाणपत्रे कशी आणि कुठे जमा करायची इथपर्यंत पालक आणि विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ उडते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आजच्या घडीला स्मार्टफोनवर स्मार्ट ॲप्स उपलब्ध आहेत ज्या तुमची तारांबळ होण्याआधीच योग्य माहितीच्या आधारे अगोदरच तुम्हाला सावध आणि योग्य तयारीत ठेवू शकतात. ओळख करून घेऊ या अशाच काही महत्त्वाच्या ॲप्सची-

## 'मस्ट हॅव'



◆ निकाल लागल्यानंतर पालकांना आणि विद्यार्थ्यांना एक मोठं दिव्य पार करावं लागतं ते दाखल्यांचं आणि कागदपत्रांचं. ही कागदपत्र 'मस्ट हॅव' म्हणजे असावीच लागतात. ती पूर्ण नसल्यास प्रसंगी ॲडमिशनलाही मुकावं लागतं. शिवाय मनस्ताप होतो तो वेगळा. त्यामुळे या ॲपचं नावच 'मस्ट हॅव' असं आहे. 'मस्ट हॅव' या ॲपद्वारे तुम्हाला दाखले कसे, कुठे काढायचे, त्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात, त्याची प्रक्रिया कशी असते याची इत्थंभूत माहिती मराठीत मिळेल.

◆ आधार ओळखपत्र, जन्म-मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, मिळकत कर, परवाने, रेशन कार्ड, नाव बदल, पॅनकार्ड, पासपोर्ट, आरटीओ, अपंग योजना, इंदिरा आवास, समाज कल्याण, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माहितीचा अधिकार, जातीचे दाखले, नॉन क्रिमीलेयर, तलाठी नोंदयही, मतदार ओळखपत्र अशा अनेक महत्त्वाच्या कागदपत्रांशी निगडित सर्व माहिती यात आहे.

## क्लिक फॉर ॲडमिशन




◆ प्रवेश प्रक्रियेतील अडथळे पार करता यावेत यासाठी क्लिक फॉर ॲडमिशन हे ॲप उपयुक्त आहे. महाविद्यालयांची प्रवेशप्रक्रिया कशी चालते ते विद्यार्थ्यांना या ॲपद्वारे जाणून घेता येईल. शिवाय ज्यांच्याकडे ॲण्ड्रॉईड स्मार्टफोन नसेल त्यांना www.clickforadmission.in या वेबसाईटवर जाऊन माहिती घेता येईल.

◆ राज्यातील सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे ही जिल्ह्यांनुसार विभागलेली आहेत. त्याबद्दलची विभागवार माहिती एका ठिकाणी सोईस्कररीत्या मिळते. या ॲपमध्ये राज्यातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माण तसेच इतर डिप्लोमा कोर्सेस असलेल्या महाविद्यालयांची माहिती, सांकेतिक नाव, विभाग, अभ्यासक्रम, उपलब्ध जागा, महाविद्यालयीन संक्षिप्त माहिती, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, तसेच मागील वर्षाच्या कॅप राऊंड तसेच कटऑफ लिस्टची माहिती देण्यात आली आहे.

◆ या काळात विद्यार्थ्यांच्या मनावर खूप ताण येत असतो; तो येऊ नये याकरिता बाबा आमटे, सुधा मूर्ती, अमिताभ बच्चन, धीरूभाई अंबानी, बिल गेट्स यांसारख्या यशस्वी व्यक्तींचा तसेच प्रतिकूल परिस्थितीतून आयएएस, आयपीएस झालेल्या अधिकाऱ्यांचा जीवनपरिचयही या ॲपमधून करून देण्यात आला आहे.

# ‘मस्ट हॅव’ ॲपद्वारे मिळणार विविध दाखल्यांबाबत माहिती

प्रतिनिधी | जुने नाशिक

शासकीय कार्यालयांतून विविध प्रकारचे दाखले मिळवण्यासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. बऱ्याचदा आवश्यक कागदपत्रांअभावी किंवा परिपूर्ण माहिती नसल्यामुळे एखादा दाखला मिळविण्यासाठी अडचणी येतात. यावर पर्याय म्हणून आनंद शिरसाठ या तरुणाने ‘मस्ट हॅव’ हे ॲन्ड्रॉइड ॲप तयार केले आहे. त्याद्वारे आता विविध दाखले मिळवण्यासाठी तसेच, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती क्षणार्धात मराठी भाषेत माहिती उपलब्ध होणार आहे.

परीक्षांचा कालावधी संपल्यानंतर महाविद्यालयीन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांसह पालकांची धावपळ सुरू होईल. अशावेळी अनेक विद्यार्थी आवश्यक कागदपत्रे, शासकीय दाखले, प्रक्रियेबाबत पुरेशी माहिती नसणे यामुळे प्रवेशापासून वंचित राहतात. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी आनंदने तयार केलेल्या या ‘मस्ट हॅव’ या ॲन्ड्रॉइड ॲपची मोठी मदत होणार आहे. या ॲपचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात विविध प्रकारचे दाखले कसे मिळवायचे, योजनांचा लाभ कसा घ्यायचा, त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असून, संपूर्ण प्रक्रिया कशी असते, याबाबत सर्व माहिती देण्यात आली आहे. तीदेखील मराठी भाषेत. त्याचबरोबर महाराष्ट्र तसेच केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहितीही या ॲपमध्ये देण्यात आली आहे. ॲन्ड्रॉइड मोबाइल यूजर्सना आता हे ॲप मोफत डाउनलोड करता येऊ शकेल.




## माहितीयुक्त ॲप

आधार ओळखपत्र, महाविद्यालयीन प्रवेश, जन्म-मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, नळ जोडणी, आरोग्य, समाजकल्याण विभागाच्या योजना, वाहनपरवाना, माहितीचा अधिकार अशा व्यक्तिगत, सामूहिक हिताच्या योजनांची माहिती या ॲपमध्ये देण्यात आली आहे. हे ॲप मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअरवर वर ‘MUST HAVE’ (मस्ट हॅव) नावाने उपलब्ध आहे. तसेच, ९५९५८४५०३९ या व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क करून लिंक मिळवू शकता.

## पाच हजारांहून अधिक यूजर्सने केले डाउनलोड



महाविद्यालयीन प्रवेशावेळी कागदपत्रांची जमवाजमव करताना अनेक अडचणी येतात. दाखल्यांअभावी प्रवेशापासून वंचितही राहावे लागते. विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी मी हे ॲप बनवले आहे. पाच हजार यूजर्सने ते डाउनलोडही केले.

**आनंद शिरसाठ, सॉफ्टवेअर डेव्हलपर, नाशिक**

aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE

लोकमत
नाशिक
गुरुवार, दि. १९ मार्च २०१५

# सरकारी दाखल्यांचे 'MUST HAVE'

## मराठी ॲप : एका क्लिकवर माहिती


विजय मोरे
cnx@lokmat.com

**नाशिक, दि.१८ : पाल्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी हवे असणारे विविध प्रकारचे दाखले, वाहन परवाना, पासपोर्ट अथवा राज्य सरकार व केंद्र सरकारच्या नागरिकांसाठीच्या विविध योजनांची माहिती असो, या सर्वांचा लाभ घेण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अर्जाची माहिती, त्यासोबत जोडावयाची कागदपत्रे, ते जमा करण्याचे ठिकाण या सर्वांची इत्थंभूत माहिती देणारे ॲण्ड्रॉइड ॲप 'मस्ट हॅव (MUST HAVE)' हे मराठी ॲप आनंद सिरसाठ या युवकाने तयार केले आहे. त्याने तयार केलेले हे मराठीतील पहिले ॲप असल्याचा दावाही त्याने केला आहे. आतापर्यंत सुमारे पाच हजार नागरिकांनी हे ॲप डाउनलोड केल्याची माहितीही या युवकाने दिली आहे.**

दहावी - बारावीची परीक्षा संपल्यानंतर आपला पाल्य महाविद्यालयीन प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी मुलाच्याच पालकांची खऱ्या अर्थाने परीक्षा सुरू होते. पाल्यांच्या विविध दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी पालक सर्व कामे सोडून सेतू कार्यालय, तलाठी कार्यालय, जात पडताळणी कार्यालयाच्या फेऱ्या मारतात आणि कधीकधी खूप मनस्तापही सहन करावा लागतो, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कागदपत्रांची पुर्तता नसणे हे असते.

खेड्यातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी किंवा शहरापासून दूर असलेल्या लोकांना कामावरून रजा घेऊन या कामांना प्राधान्य द्यावे लागते आणि नेमके यावेळी महत्त्वाचा कागद घरी विसरून गेला तर संबंधित कार्यालयाबाहेरील रांगेत तासन्तास उभे राहिल्यानंतर जेव्हा कळते तेव्हा प्रचंड मानसिक त्रास होतो. यानंतर आर्थिक नुकसान होते, रजा पडते आणि वेळही वाया जातो.

सरकारी कामासाठी लागणाऱ्या विविध प्रमाणपत्रांसाठीच्या कागदपत्रांबाबत माहितीचे तसेच यासाठी पालकांची आणि विद्यार्थ्यांची होणारी अडचण दूर करण्यासाठी व काम सोपे करण्यासाठी मराठी भाषेत माहिती असलेले ॲण्ड्रॉइड ॲप 'मस्ट हॅव (MUST HAVE)' तयार करण्यात आले आहे. यामध्ये प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची माहिती आहे. कोणत्या दाखल्यासाठी काय आवश्यक आहे, ते कुठे मिळेल, त्याचा फायदा काय या सर्व प्रश्नांची उत्तरे या ॲपमध्ये आहे. गावातील जमिनी, कर, कायदे, भूसंपादन आदि विषयांशी निगडित माहिती हवी असल्यास तलाठी कार्यालय गाठावे लागते. तलाठ्याकडील नोंदवहीत कोण-कोणत्या विषयाची माहिती असते या विषयची उपयुक्त माहितीदेखील या ॲपमध्ये आहे. वाहन परवान्याची सर्व माहिती, पासपोर्टचा अर्ज कुठे मिळेल, तो कसा भरावा, कुठे जमा करावा याची माहितीही देण्यात आली आहे. याबरोबरच महाराष्ट्र तसेच केंद्र शासनाच्या नागरिकांसाठी विविध योजना असून, त्या व्यक्तिगत तसेच सामूहिक स्वरुपाच्या आहेत, परंतु बऱ्याचदा या योजनांची माहिती नागरिकांना नसते. ती माहितीदेखील या ॲपमध्ये देण्यात आली आहे.




**Cover Story**

## 'मस्ट हॅव' ॲपमधील माहिती

आधार ओळखपत्र, महाविद्यालय प्रवेश, अभियांत्रिकी प्रवेश, जन्म-नोंदणी, मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, नळ कनेक्शन, मिळकत कर, परवाने, बांधकाम, रेशनकार्ड, नाव बदल, वीज कनेक्शन, एलपीजी कनेक्शन, पॅनकार्ड, पासपोर्ट, आरटीओ, मलेरिया, डेंग्यू, अग्निशामक दल, अन्न सुरक्षा, अपंग योजना, इंदिरा आवास, समाज कल्याण, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माहितीचा अधिकार, जातीचे दाखले, नॉन क्रिमिलेयर, तलाठी नोंद वही, एसटी महामंडळ, मतदार ओळखपत्र, विमुक्त जाती / भटक्या जमाती.




## ॲप कसे मिळवाल

हे ॲप मिळविण्यासाठी गुगलवर किंवा प्ले स्टोअरवर 'मस्ट हॅव (MUST HAVE)' या नावाने उपलब्ध आहे किंवा ९५९५८४५०३ या नंबरवरील व्हाट्स ॲपवरूनही मिळविता येईल. या ॲपची प्ले स्टोअरवरील लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.aretetechnology.musthave अशी असून, यावरूनही हे ॲप डाउनलोड करता येणार आहे.




## आतापर्यंत पाच हजार जणांनी केले डाउनलोड

सरकारी कामांसाठी आवश्यक असलेल्या विविध दाखल्यांसाठी अर्ज कोठे मिळेल, त्यासोबत कोणती कागदपत्रे जोडावी लागतील, भरलेला अर्ज कोठे द्यावा लागेल, त्याची प्रक्रिया कशी असते याबाबत नागरिकांना माहिती नसते. त्यामुळे त्यांचा गोंधळ उडतो, तसेच वेळही वाया जातो. हे सर्व होऊ नये, यासाठी त्यांना एका क्लिकवर सर्व माहिती उपलब्ध करून देण्यासाठी 'मस्ट हॅव' हे ॲण्ड्रॉइड ॲप तयार केले. आतापर्यंत सुमारे पाच हजार नागरिकांनी हे ॲप आपल्या मोबाइलमध्ये डाउनलोड केले असून, त्याद्वारे माहिती मिळविली आहे.



- आनंद सिरसाठ, ...

aspirelyfX
YOUR JOURNEY . OUR PROMISE

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/

NEWS/TV LISTINGS

NASHIK, TUESDAY, 7 APRIL 2015

Nashik FIRST

PAGE 6

# All government data at one click

## New 'Must Have' app developed to facilitate common people; 5000 downloads so far, claims developer of the app

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, APR 6

Managing the certificates necessary to get admission in any educational institutes becomes tedious for students. Therefore, here is an app that will surely help you keep a tab on all aspects of your life, alongside your studies. Developed by Anand Shirsath, 'Must Have' is an android app that is great for getting certificates, passports and information about the various government schemes. It has an extensive database of government schemes, including certificates to passport. This app is useful for the parents too as it will help them to get the necessary certificates required for admission of their children into schools and colleges.

"The 'Must Have' is the first Marathi app and is super useful," says Ramesh Desai, a psychology student. "Getting certificates for admission can be the bane of a student's life, especially when there is so much work to keep them busy," he further adds.




This app will help to track the location of the government offices even if you are new to the area, and can help you plan the quickest and least-crowded route possible. It also gives you an estimated time of arrival to save guess work. It uses a combination of real-time data from government offices and public updates to give you a procedure to get certificates that is as stress-free as possible, using maps, pictures and graphics. As many as 6000 students and parents have downloaded the app, says Shirsath.

"The 'Must Have' is a brilliant app," says Amar Patil, a PhD student. "It's perfect for getting certificates. You can get the whole list of certificates required for admission here. This app is also useful for accounting your expenses and checking your budget, showing how much you have left to spend. You can easily split your money into incomes and outgoings. And with the ability to repeat expenses and incomings, it's far less time-consuming than you might first think," Patil further adds.




### The app developed to reduce confusion among citizens: Anand Shirsath



- Anand Shirsath, who developed the 'Must Have' app, said that he has developed this android app from the common man's perspective as procuring documents from a government office is never a walk in the park. The common man always has to face hurdles like facing corrupt babus to red tape. It becomes exceedingly difficult to obtain a simple certificate in a government office.
- Getting paperwork done in the tehsil office has proved to be a Herculean task, says Shirsath. One has to suffer a lot of trouble to get a simple certificate such as income certificate or caste certificate. Further, one has to make regular visits to the office to get his work done. Besides, he has to stand in the queue for almost two to three hours.
- However, residents can now breathe easy. Some of the government documents in the taluka will be available online and the residents can procure these documents from home. The residents from any village in Nashik will be able to apply for divergence, income, caste and residence certificates and Form 1 and 14 easily.
- With most of the villages in the taluka located in remote areas, civic facilities are comparatively less than what they are in villages near the towns. It becomes very hard for people living in these areas of the state to travel frequently to cities, as public transport facility is far less and irregular. As Nashik district is still developing, the city has not yet harnessed technology completely nor has it applied it to most of its services. But that is gradually changing at least in the city.
- This app would, to a great extent, reduce their efforts of travelling to the tehsil office from various remote parts of the taluka. The people would not require to personally approach the office for their residence or caste certificates. This will surely save the people's time and energy for this purpose.






This is the ultimate organisation tool that syncs all your data on all of your devices. From to-do lists to lecture notes, it's a great app for organising your entire life in folders that you can access on your phone, tablet and laptop. It works across file formats too, so you can save notes in text, image, audio and web links to look at later. It's easy to find anything you save through a search tool that scours all of your content.

"It is very convenient," says second-year literature student, Vandana Kale. It helps to take notes in lectures more efficiently and I can access the notes across all my devices. It is the easiest way to stay on top of all your updates in one application. It's a customizable app which allows you to pick and choose what you want to read via subject and organise it accordingly. Forget bundles of notebooks, cards and posters, it is the digital spot for all your revision notes. Its main features are mind-maps, flash-cards, quizzes and notes, which you can use to input the things you want to try and remember. It also lets you make your own revision timetable and allows access to practice papers," she elucidates.


पीएमओ ऍप स्पर्धेत नाशिकच्या आनंदची भरारी
नाशिक
साम
टॉप स्टोरीज
सकाळ
ली,दादर,ठाणे,डोंबीवली)-9167372888,पुणे(कर्वेरोड,हडपसर,पिंचवड)-9


तंत्रज्ञानात नाशिकची पोरं हुश्शार.... !
नाशिक
२४ तास
आनंद शिरसाट, ऍप विकसित करणारा
facebook.com/zee24taas

aspirelyfX
YOUR JOURNEY . OUR PROMISE

महाराष्ट्रातील क्र. २ चा वृत्तपत्र समूह
ई पेपर : epunyanagari.com
पुण्य नगरी
शनिवार, दि. ४ एप्रिल २०१५
नाशिक । वर्ष : १५ । अंक : ३५९ । पाने : १२+४+४=२० । किंमत : ४ रुपये

# पंतप्रधानांच्या मोबाइल ॲपसाठी नाशिकच्या तरुणाची निवड

नाशिक, दि. ३ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान मोबाइल ॲपसाठी विविध संकल्पना पाठविण्याची स्पर्धा नुकतीच झाली. त्यात राष्ट्रीय स्तरावर अंतिम २० जणांमध्ये नाशिकचे सॉफ्टवेअर डेव्हलपर आनंद शिरसाठ यांचा समावेश आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नॅसकॉमच्या सभेत पंतप्रधान मोबाइल ॲप तयार करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर भारतीयांकडून कल्पना दि. ४ ते २३ मार्च दरम्यान संकल्पना मागविण्यात आल्या होत्या. यासाठी ५० हजारांच्यावर कल्पना पाठवल्या गेल्या. त्यातून अभ्यास केल्यानंतर २० कल्पना निवडण्यात आल्या. नावीन्यपूर्ण मांडणी, प्रत्यक्षात कल्पना अंमलात येऊ शकेल की नाही आणि लोकप्रियता गुणावर या २० कल्पना निवडण्यात आल्या. त्यात नाशिकचे सॉफ्टवेअर डेव्हलपर आनंद शिरसाठ यांचीही कल्पना निवडण्यात आली आहे.

ॲप असे हवे की, अंध, अपंग लोक ही ते सहज वापरू शकतील आणि जसे आज ई-बुक ध्वनीमध्ये उपलब्ध आहे. त्यासारखेच अक्षरातून ध्वनी यामध्ये असावे. त्यामुळे अशिक्षित, ग्रामीण भागातील, सामान्य नागरिक वापरू शकतील आणि त्यातील माहिती सहज कळू शकेल. 'पंतप्रधानांचा आवाज' ठरू शकेल, असे शिरसाठ यांनी सुचविले होते. शिरसाठसह निवड झालेल्या २० जणांना सरकारकडून प्रमाणपत्र पारितोषिक स्वरूपात मिळेल आणि गुगलकडून अँड्रॉईड वन डिव्हाइस मिळेल. पंतप्रधान ॲपसाठी गुगलचेही सहकार्य आहे.

aspirelyfx
YOUR JOURNEY . OUR PROMISE

शब्दगंध
कव्हर
बदलीमागे 'कारण' की 'राजकारण'?
पान ३
दिल्लीत प्रदूषणाचा भस्मासूर!
पान १४
अब गोली खा डॅड्या!



पान १०
हेअरब्रश

नवी आशा नवी दिशा
देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ४५ | अंक २१४ | रविवार, दि. ५ एप्रिल २०१५ | पाने १२+१६ | किंमत ₹ ४

# 'पीएमओ' ॲपसाठी नाशिककराची संकल्पना 'भारी'

■ नाशिक । दि. ४ प्रतिनिधी

पंतप्रधान कार्यालयाला (पीएमओ) तंत्रज्ञानाने समृद्ध करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात येत असलेल्या 'पीएमओ ॲप'साठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून घेण्यात येत असलेल्या स्पर्धेत नागरिकांकडून कल्पना मागवण्यात येत आहेत. तीन टप्प्यात होणाऱ्या स्पर्धेतील पहिल्या टप्प्यातील स्पर्धेचा निकाल गुरुवारी जाहीर करण्यात आला. यात नाशिकच्या तरुणाने दिलेल्या संकल्पनेची निवड करण्यात आली असून देशभरातून आलेल्या पन्नास हजार ॲपमधून २० कल्पना स्वीकारण्यात आल्या. यात नाशिकची निवड करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ॲपची कल्पना नॅसकॉमच्या कार्यक्रमात बोलताना मांडली होती. मोदींच्या 'डिजिटल इंडिया' अभियानाचाच एक भाग म्हणून या ॲपकडे पाहिले जाते. देशातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत केंद्र सरकारला संपर्क साधता यावा यासाठी ही ॲपची संकल्पना पंतप्रधानांनी मांडली. केंद्र सरकाराला विविध योजनांसाठी सूचना, प्रशासनातील तक्रारी इत्यादींसाठी हे ॲप फायद्याचे ठरणार आहे. mygov.in या वेबसाईटच्या माध्यमातून ही स्पर्धा घेण्यात येत आहे. तीन टप्प्यात होणाऱ्या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात ४ मार्च ते २३ मार्चदरम्यान देशभरातील नागरिकांकडून कल्पना मागवण्यात आल्या होत्या. यात ५० हजार संकल्पना प्राप्त झाल्या.

## अशी आहे संकल्पना

आनंदने विकसित केलेले ॲप अंध, अपंग व्यक्तीही सहजपणे वापरू शकणार आहेत. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना ॲप हाताळता येत नाही. याकरिता शासनाच्या योजनांची माहिती, शासन निर्णय इ-बुक ध्वनीमध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे अशिक्षित, ग्रामीण भागातील नागरिक, सामान्य नागरिकांना सहज माहिती मिळू शकेल, असे ॲप्लिकेशन यात विकसित करण्यात आले आहे. यात पंतप्रधानांचा आवाजही ऐकू येणार आहे.

नावीन्यपूर्ण मांडणी, प्रत्यक्षात कल्पना अंमलात येऊ शकेल की नाही आणि लोकप्रियतेच्या निकषावर पहिल्या टप्प्यातील स्पर्धेत सर्वोत्तम २० संकल्पनांचा स्वीकार करण्यात आला. यात नाशिकचा सॉफ्टवेअर इंजिनिअर आनंद शिरसाठ याने दिलेल्या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. महाराष्ट्रातून निवडण्यात आलेल्या तीन संकल्पनांमध्ये नाशिकनेही नाव पटकावले आहे. सर्वसामान्यांनाही समजेल अशा स्वरुपात ॲप विकसित केले असल्याचे आनंदने सांगितले.

स्पर्धेसाठी गुगलचे सहकार्य घेतले जाणार आहे. येत्या तीन महिन्यात ही स्पर्धा घेतली जाणार आहे. तीन महिन्यानंतर जे सर्वोत्कृष्ट ॲप असेल त्याचे पंतप्रधान कार्यालयात सादरीकरण केले जाणार आहे. ॲप स्पर्धेच्या विजेत्याला गुगलच्या अमेरिकेतील मुख्यालयाला भेट देण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आलेल्या संकल्पनांमधून सर्वोत्तम संकल्पनांचा स्वीकार करून पाच ॲप तयार करायचे आहेत. त्यातून एकाची निवड 'पीएमओ' ॲपसाठी करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील स्पर्धेत नाशिकने बाजी मारल्याने ही नक्कीच अभिमानाची बाब ठरणार आहे.

## मला अभिमान



देशभरातून आलेल्या पन्नास हजार संकल्पनांपैकी ज्या २० संकल्पना निवडण्यात आल्या त्यात माझी कल्पना निवडण्यात आली याचा मला आनंद आहे. विशेष म्हणजे नाशिकचे नाव मी देशभरात पोहोचवू शकलो याचा मला अभिमान आहे. सर्वसामान्यांना या ॲपचा उपयोग होऊन आणि पीएमओ ने ठरवलेले ध्येय पूर्ण व्हावे याचा विचार करून हे ॲप मी विकसित केले. यातील पहिला टप्पा पार केला असून उर्वरित दोन टप्प्यांसाठी मी मेहनत घेत आहे.

**आनंद शिरसाठ, सॉफ्टवेअर इंजिनिअर**

aspirelyfX
YOUR JOURNEY . OUR PROMISE

# Anand Shirsath's idea selected for PMO's Application contest

**LOKMAT NEWS NETWORK**
**NASHIK, APR 12**

An application idea of a student of Kalyani Charitable Trust's GN Sapkal Engineering College, Anand Shirsath, has been selected in the final 20 of PMO Application competition.

Prime Minister Narendra Modi had announced a application which will help the administration become people-centric and which will give it a chance to stay connected with public continuously.


For the fulfillment of this need PM's Office (PMO) recently conducted a competition wherein 50,000 participants across India participated and presented their projects and concepts. Nashik boy Shirsath's application idea has been selected in the top 20 finest applications in this contest.




Anand Shirsath (centre) being congratulated by Ravindra Sapkal at GN Sapkal Engineering College

"I always wanted to use my engineering knowledge for public welfare and through this competition I got an opportunity to do so. I am happy that these applications will help people get in touch with the PM directly. The practical knowledge I gained from Sapkal Knowledge Hub helped me a lot while preparing the application," says Shirsath.

Managing director of Sapkal Knowledge Hub Ravindra Sapkal, vice-president Kalyani Sapkal, principal Dr VJ Gaund and Dr NR Wankhede felicitated and congratulated Shirsath for his achievement.













**अभियान** | जिल्ह्यातील १००० शाळांत गिरवणार संगणकाचे धडे

# अभियांत्रिकीचे विद्यार्थी घेणार १०० शाळा दत्तक

**सुखद सोमवार**

## बालदिनानिमित्त डिजिटल इंडियासाठी उत्सव कल्पकतेचा

गणेश डेमसे | नाशिक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी 'डिजिटल इंडिया' कॅम्पेनमध्ये सर्वोत्कृष्ट ॲप तयार करून पुरस्कार प्राप्त करणाऱ्या शहरातील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बालदिनाचे औचित्य साधत शाळांमध्ये संगणक साक्षरतेची मोहीम राबविण्यासाठी पुढाकार घेतला. या अभियानात शहरातील १०० शाळा दत्तक घेतल्या जाणार आहेत, तर ग्रामीण भागातील तब्बल १००० शाळांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांना संगणक साक्षरतेचे धडे दिले जाणार आहेत.

उपक्रमात संगणक, इंटरनेट व मोबाइल ॲपसह आधुनिक तंत्रज्ञानाविषयी प्रशिक्षण दिले जाणार असल्याने डिजिटल इंडियाच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊलच ठरणार आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेल्या १३ विद्यार्थ्यांनी उत्सव कल्पकतेचा ही संगणक साक्षरतेची मोहीम सुरू केली आहे. अरेट संस्थेंतर्गत आनंद शिरसाठ यांच्या मार्गदर्शनात या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन हे अभियान हाती घेतले.

पंतप्रधान मोदी यांचे डिजिटल इंडियाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेटमधील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी खास संगणक ३६० हे ॲपही विकसित करण्यात आले आहे. उपक्रमांतर्गत महापालिका शिक्षण मंडळाच्या सहकाऱ्याने १०० शाळा दत्तक घेतल्या जाणार आहेत, तर ग्रामीण भागातील अनाथ मुलांसाठीच्या शाळा व जिल्हा परिषदेच्या अशा एक हजार शाळांमध्ये महिन्यातून एक दिवस विद्यार्थी व शिक्षकांना संगणक साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी महापौर अशोक मुर्तडक यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसेच शिक्षण विभागालाही सदरच्या अभियानाबद्दल शाळांच्या सहभागासाठी पत्र देण्यात आले आहे. या अभियानात मनोज काशीद, ज्ञानेश्वर नवले, योगेश शिरसाठ, रोहिणी हिरे, तुषार सूर्यवंशी, वृषाली बागुल हे शाळा-शाळांत जाऊन विद्यार्थ्यांना संगणकाचे धडे देणार आहेत.



## सामाजिक विषयांवरही होणार प्रबोधन

पंतप्रधान मोदी यांनी डिजिटल इंडियासाठी तयार केलेल्या ॲपची दखल घेतल्याने त्यातून प्रेरणा मिळाली. संगणक साक्षरतेबरोबरच स्त्रीभ्रूण हत्या, पर्यावरण संवर्धन, पाणी वाचवा, वाहतूक सुरक्षा याविषयांवरही ॲनिमेशनच्या माध्यमातून प्रबोधन केले जाईल.

## संगणक साक्षरता वाढेल



ग्रामीण भागात तसेच अनाथ मुलांच्या शाळेत संगणक साक्षरतेचा अभाव आहे. संगणकाशिवाय प्रगती साधणे शक्य नसल्याने आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना संगणक साक्षरता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

**आनंद शिरसाठ,** अभियान प्रमुख

## माहितीपटातून प्रशिक्षण



तंत्रज्ञानाविषयीची आवड रुजविली जावी, यासाठी दिवंगत शास्त्रज्ञ डॉ. कलाम कट्टा ॲप तयार केले आहे. विद्यार्थ्यांना साहित्य, चित्र, संगीत, व्यक्तिविशेष व तंत्रज्ञानाचे ज्ञान माहितीपटांतून दिले जाईल.

**प्रियंका चुंभळे,** विद्यार्थी, अभियांत्रिकी

I am in dna Of Nashik

# Nashik students get the gift of digital education on Children's Day

Saturday, 14 November 2015 - 4:52pm IST | Vaishali Balajiwale | Edited by: Disha Shetty

Tweet 4 Share 2 G+1 0 Comments (0)

Anand Shirsath, Nashik based techie has launched 'Back to School' programme to train students and teachers in basic computer applications.

With an aim to spread digital literacy in schools, a young IT innovator Anand Shirsath has launched three mobile apps and a web portal for students. He will spend the next three months training students and teachers from 100 rural and government schools in basics of computers.

Shirsath launched his 'Back to School' programme on November 14 to coincide with Children's Day.

"This programme is free of cost for students and is a step forward in making India digital. I feel that digital India Mission must start from bottom and move upwards which is why we are focussing on educating children. Many are not exposed to computers or android phones," Shirsath said.

As a part of 'Back to School', a team from Arete Technology, his firm that develops digital content, will visit schools and introduce students to computers. They will be taught basic operations. Teachers will also be trained so that they can take the literacy campaign forward.

He has developed several mobile apps in the past that target kids.

**Apps developed by the young innovator**
**Sanganak 360:** An application dedicated to increase digital literacy among students in Marathi

**Android Aaji:** It is designed along the lines of *Aajibai cha batawa*, when the grandmothers would suggest home remedies for illnesses in the time gone by. It is an app that suggests ayurvedic remedies that can be made at home

**Kalam Katta:** Dedicated to Dr APJ Abdul Kalam, this app and portal is an extension of the *Vachan Prerana Din* – the reading day to commemorate Dr Kalam's birthday. It acts as a platform for children, teachers and parents to talk about various topics, including that of smart city, digital India, modern agriculture, poems, songs, writings, etc on the app and the portal which will be available for all to read.

aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE






पाथर्डी फाटा : अरेट टेक्नॉलॉजीतर्फे विकसित करण्यात आलेल्या मोफत अॅन्ड्रॉईड अॅप्सचा सोमवारी लोकार्पण सोहळा झाला. त्या वेळी उपस्थित आमदार सीमा हिरे, महापौर अशोक मुर्तडक, माजी आमदार वसंत गिते, संचालक आनंद शिरसाठ, पांडुरंग शिरसाठ आदी.

# बालदिनासाठी नवे आठ अॅन्ड्राईड अॅप्स

## माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांना वाहिली अनोखी आदरांजली ; अरेट टेक्नॉलॉजीचा पुढाकार

**सकाळ वृत्तसेवा**

इंदिरानगर, ता. ९ : पाथर्डी फाटा येथील अरेट टेक्नॉलॉजीतर्फे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना आदरांजली म्हणून खास दिवाळी आणि बालदिनासाठी तयार करण्यात आलेल्या आठ अॅन्डॉईड अॅप्सचा लोकार्पण सोहळा आमदार सीमा हिरे यांच्या हस्ते झाले. या वेळी महापौर अशोक मुर्तडक, माजी आमदार वसंत गिते, माजी नगरसेवक मामा ठाकरे, संजय नवले प्रमुख पाहुणे होते.

संस्थेचे संचालक आनंद शिरसाठ यांनी याबाबत माहिती दिली. हे सर्व अॅप गुगल स्टोअरमधून सहजरीत्या डाउनलोड करता येतील. यात कलाम कट्टा- विद्यार्थ्यांनी व वाचकांनी तयार केलेले साहित्य, यशोगाथा, प्रेरणादायी लेख यांचा समावेश आहे. माझ्यातील कलाम- यातून विज्ञानाची गोडी वाढवणाऱ्या बाबींचाही समावेश आहे. संगणक ३६० अॅपद्वारे पंतप्रधानांचे स्वप्न असलेल्या डिजिटल इंडिया संकल्पनेचा वापर करण्यात आला आहे. हे अॅप मोफत असल्याने त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. या वेळी पांडुरंग शिरसाठ, दादा मेढे, बाळासाहेब पाटील, निवृत्ती दातीर, योगेश नवले, सुनील वाजे आदींसह नागरिक उपस्थित होते.

### आजीबाईंचा डिजिटल बटवा

**अॅन्ड्रॉईड आजी अॅपमुळे आजीबाईंचा बटवा डिजिटल स्वरूपात मांडण्यात आला आहे. मस्ट हॅव याद्वारे विविध शासकीय दाखले, ते कुठे मिळतात, त्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक असतात आदी माहिती अद्ययावत केली आहे. अॅन्ड्रॉईड बालवाडीत विविध बालगीते, तसेच मराठी- इंग्रजी बाराखडीचा अंतर्भाव केला आहे. पर्यावरण मूल्ये, सुरक्षित दिवाळी आणि वाहतुकीच्या नियमांच्या माहितीसाठी हे अॅप तयार केले आहे.**

# शाळांमध्ये राबविणार 'उत्सव कल्पकतेचा'

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे डिजिटल इंडियाचे स्वप्न शहरी भागाबरोबर ग्रामीण भागात पोहोचले तरच संपूर्ण देश खऱ्या अर्थाने डिजीटल होण्यास मदत होईल, या विचाराने नाशिकमधील अरेट टेक्नॉलॉजी संस्थेने पुढाकार घेतला आहे. कॉम्प्युटर, इंटरनेटची माहिती देणारे संगणक ३६० हे अॅप तयार केले असून, यामार्फत ते महापालिकेच्या शाळा व ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणक साक्षरतेसंबंधित 'उत्सव कल्पकतेचा' उपक्रम राबविणार आहेत.

**डिजिटल इंडियासाठी अरेट टेक्नॉलॉजीचा पुढाकार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देशाला डिजिटल बनविण्याचे स्वप्न आहे. संपूर्ण देश कॉम्प्युटर, इंटरनेट वापराबाबत साक्षर असावा, असा उद्देश यामागे आहे. मात्र, असे असले तरी ग्रामीण भाग यापासून पूर्णत: अनभिज्ञ आहे. या भागातील शाळांमध्ये डिजिटल इंडियाची संकल्पना रुजवल्यास त्याचा फायदा निश्चितच देशाला होऊ शकतो, या उद्देशाने अरेट टेक्नॉलॉजीचे संचालक आनंद शिरसाठ यांनी पुढाकार घेतला आहे. यासाठी महानगरपालिकेच्या १०० शाळांमध्ये व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एक हजार शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार आहे. शाळांबरोबरच या भागातील नागरिकांना व शिक्षकांनाही उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे. कॉम्प्युटर, मोबाइल व अॅप यांविषयी माहिती या उपक्रमात दिली जाणार असून, याचा वापर कसा करावा, याविषयी प्रात्याक्षिकेही घेतले जाणार आहेत.

संगणक साक्षरतेबरोबरच पुढील पिढी सामाजिकदृष्ट्या नीतिमत्ता जपणारी व समाजाचा आदर करणारी असावी, यासाठी स्त्रीभ्रूण हत्या, पर्यावरण संवर्धन, पाणी वाचवा, वाहतूक सुरक्षा जागर याविषयी प्रबोधन करणार आहेत. त्यासाठी १४ अॅनिमेशन शॉर्टफिल्म तयार करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना या सर्व फिल्म्स दाखविण्यात येणार आहेत. हे अॅप व हा उपक्रम पूर्णत: मोफत राबविण्यात येणार आहे.

### अनाथाश्रमातील मुलांसाठी एक दिवस

शाळांमध्ये जाऊन संगणक साक्षरतेसाठी प्रयत्न करण्याबरोबरच अनाथ आश्रमांमध्येही हा उपक्रम राबविला जाणार आहे. समाजातील सर्व वंचित घटकांना डिजीटल इंडियाच्या संकल्पनेत समाविष्ट करून घेण्यासाठी यामार्फत प्रयत्न केले जातील. दर महिन्यातील एक दिवस या मुलांसाठी दिला जाणार आहे.

**विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यासाठी शाळेत जाऊन तंत्रज्ञानाविषयी माहिती देण्यासाठी पुढाकार घ्यावा, या पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद आम्ही या उपक्रमातून करीत आहोत. यामुळे डिजिटल इंडियाचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी हातभार लागेल.**

- आनंद शिरसाठ,
संचालक, अरेट टेक्नॉलॉजी

# Arena launches special apps on Diwali

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, NOV 11





On the occasion of Diwali and Children's Day and in honour of late Dr APJ Abdul Kalam, Arena Technology recently launched various new mobile applications.

MLA Seema Hiray, corporator Ashok Murtadak, former MLA Vasant Gite, Mama Thakare, Sanjay Nawale and Pandurang Shirsat were among the dignitaries present on the occasion.

Various apps launched by Arena include the 'Android Aaji'- an app designed to provide home remedies for various health troubles, 'Sanganak 360'- an app designed to provide complete information about computers and internet to rural population with the motive of fulfilling Prime Minister Narendra Modi's Digital India dream and 'Kalam Katta'- an app through which children, students and parents can share their talents with the world with respect to various fields like arts, science, music and literature among others.

Director of Arena Anand Shirsath gave information about all these apps during the occasion.

Under their programme, 'Utsav Kalpaktecha', the organisation will also be enabling computer access in all the schools across Nashik district and will also provide an opportunity to kids of various orphanages to learn computer application once a month.

Children will also be informed about social issues like female foeticide, environmental pollution, traffic control, safety and water management through various animation films.

All the applications are free of cost and people can avail them at any time of the day.

रविवार, २२ नोव्हेंबर २०१५ | लोकमत ९

लपविण्याचे तात्पुरते पाप करायला काहीच हरकत नाही" - असे हितेश आज गमतीत सांगतो. ही सगळी मध्यमवर्गातील, सुशिक्षित स्तरातील उदाहरणे झाली. मात्र काही आंत्रप्रनर्स याहून कठीण, गरिबीच्या आणि अभावाच्या पार्श्वभूमीतून येऊन मोठे झालेले आहेत.

आनंद शिरसाट अशाच काही लोकांपैकी एक. त्याचे आईबाबा तर पाथर्डीमध्ये शेती करतात. ते अजिबात शिकलेले नव्हते की त्यांनी कधी लॅपटॉप पाहिला नव्हता. पण त्यांनी आनंदला इंजिनिअर व्हायला आणि नंतर स्वतःचे स्टार्ट अप सुरू करायला पूर्ण पाठिंबा दिला.

आनंद म्हणतो, "मी माझे कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले खरे, पण शिकत असताना काहीतरी वेगळे करण्याचा विचार माझ्या मनात येत असे."

मग त्यानेही या वेगळे काहीतरी करण्याच्या कल्पनेला न्याय दिला. नाशिकमध्येच त्याने ॲरेटे टेक्नॉलॉजी नावाची कंपनी स्थापन केली. यावेळेसही त्याच्या आईबाबांनी त्याला भक्कम साथ दिली. कारण, तो नक्की काय करतो हे त्यांना नीट माहितीही नव्हते.

'काय करतो तुमचा मुलगा?' - असा साचेबंद प्रश्न कुणी विचारला की त्याचे बाबा म्हणतात,

"काहीतरी करतो... टीव्ही, पेपरात असतो सारखा."

(त्याच्या कंपनीची माहिती, त्याची यशोगाथा मीडियामध्ये छापून येते.)

आनंद आपल्या आईबाबांवर भारीच खूश आहे.

ते फार विचार करत नाहीत. त्यांचा आपल्या लेकावर पूर्ण विश्वास आहे, एवढेच!

पालक कमी शिकलेले किंवा निरक्षर असतील, तर मुलांकडून असलेल्या अपेक्षांच्या बाबतीत ते फार आग्रही नसतात. आपण जे करू त्याला पाठिंबा देतात, असा आनंदचा अनुभव आहे.

(रश्मी बन्सल : तरुण भारतीय उद्योजकांच्या प्रेरणादायी कथा सांगणाऱ्या सात पुस्तकांच्या मालिकेच्या लोकप्रिय लेखिका.
विद्यार्थिदशेतच उद्योजक होणाऱ्या मुलामुलींच्या प्रवासाचा वेध घेणारे 'अराइज अवेक' हे त्यांचे नवे पुस्तक.)

aspirelyfX

YOUR JOURNEY . OUR PROMISE



# आमच्या आई-बाबांचं काय?

## तरुण उद्योजक आणि त्यांच्या पालकांच्या पिढीचा संघर्ष

हिंमत दाखवून केलीच नव्या प्रवासाला सुरुवात, तर लगेच आई-बाबा विचारतात, 'दोन महिन्यांत तुझी ही स्टार्ट अप कंपनी बंद पडली की मग काय करशील?' - 'एक मौका तो दिजिये फेल होनेका' असं म्हटलं की लगेच तीर्थरूप कडाडतात, 'बस, वही एक दिन तो हम देखना नही चाहते...' - आयुष्यभराच्या झगड्याने तोंड पोळलेल्या जुन्या पिढीला आपल्या मुलांच्या वाट्याला अपयश येण्याची शक्यतासुद्धा सहन करता येत नाही. ते हे विसरतात की, पिढी बदलली, तसे आजूबाजूचे वास्तवही बदलले आहेच की!

रश्मी बन्सल

अनुवाद : ओंकार करंबेळकर

भारतातल्या अनेक तरुणांना आज स्वत:चं स्वप्न साकारायचं आहे. नोकरीतली टिपिकल खर्डेघाशी न करता स्वत:ला आजमावून पाहायचं आहे. त्यासाठी अमेरिका वगैरे परक्या देशात न जाता हे सारं आपल्या मातीतच आजमावून पाहायचं आहे. या वाटेवरून आज भारतातली हजारो तरुण पावलं चाललेली आहेत..

अर्थात हा प्रवास सोपा नव्हता आणि नाही..

बऱ्याच तरुणांच्या बाबतीत पहिला अडथळा आजही आहे आणि तोही घरातूनच।

हो, आपले आई-बाबा हा त्यांच्या मार्गातला पहिला अडथळा आहे. 'नोकरीसारखा सिक्युअर मामला सोडून पळत्याच्या पाठीमागे पळून तोंडावर आपटून विषाची परीक्षा का घ्या? हा त्यांचा रोकडा सवाल आहे.

वेगळ्या वाटेनं जायची आमची तयारी आहेच, पण आई-बाबांना कसं मनवायचं हा या तरुणांपुढचा सर्वांत मोठा प्रश्न आहे. त्याबद्दल ते उघडपणे विचारतातही..

'हे सगळं ठीक आहे हो.. पण आमच्या आईबाबांचं काय? त्यांनी आम्हाला इतकं मोठं केलं, वाढवलं, आमच्यासाठी खस्ता खाल्ल्या, त्यांच्या आता अपेक्षा आहेत आमच्याकडून, त्यांच्या अपेक्षांचं काय?

- द व्हायरल फिव्हरने केलेला 'पिचर्स'चा एक एपिसोड यू ट्यूबवर दिसतो, त्यात याच 'आईबाबांच्या अपेक्षांचे काय?' सिंड्रोमची चर्चा आहे.

एक तरुण आंत्रप्रनर या घोळाचा सामना करतो आहे. त्याचे नाव जितू.

जितूच्या बाबांच्या मनामध्ये ही शंका बरेच दिवस असते,

की आपला मुलगा ऑफिसमध्ये नक्की जातो की नाही...? तो रात्री फार उशिरा येतो... काय करतो, कोठे जातो याचा काहीच थांगपत्ता लागू देत नाही. तो नक्की जातो कुठे?

शेवटी मनाला सतावणाऱ्या या प्रश्नांची तड लावायला जितूचे बाबा अचानक त्याच्या घरी येऊन थडकतात आणि व्योमकेश बक्षी स्टाइल तपासाला सुरुवात करतात.

आल्याआल्याच सूनबाईंना विचारतात,

'सबकुछ ठीक तो है ना?

सूनबाई हो म्हणतात, तरी या तीर्थरूपांचा विश्वास बसत नाही. त्यांना शंका असतेच- दालमें जरूर कुछ काला है! नक्की याचे बाहेर कोणा बाईबरोबर लफडे सुरू असले पाहिजे, नाहीतर हा एवढ्या उशिरा जातो कुठे? करतो काय?

नशीब, जितूच्या बायकोला आधीच सगळे माहिती असते.

जितूने त्याच्या बायकोला विश्वासात घेऊन आपण नोकरी सोडून स्टार्ट अप टीममध्ये सहभागी झाल्याचे आधीच सांगितलेले असते.

नोकरी सोडण्याची हिंमत आहे, पण वडिलांना त्याबद्दल खरे सांगण्याची हिंमत नाही अशी जितूची अवस्था.

शेवटी न राहवून, नाइलाजाने जितूची बायको ती हिंमत करते आणि तपासाला आलेले व्योमकेश बक्षी कोसळतातच।

काही वेळाने- म्हणजे पुरेशा उशिराने जितू घरी येतो.

आल्या आल्या तो कुप्रसिद्ध यक्षप्रश्न तीर्थरूप त्याच्या तोंडावर अक्षरश: अस्त्रासारखा फेकतात,

"दोन महिन्यांत तुझी ही स्टार्ट अप कंपनी बंद पडली की मग काय करशील?"

- जितूची बायको थंड बसलेल्या जितूच्या मदतीला येते. म्हणते,

"आलं अपयश तर आलं, एक मौका तो दिजिये इसे फेल होनेका!"

तीर्थरूप कडाडतात,

"बस, वही तो एक दिन हम देखना नही चाहते..."

अपयश.

या शब्दातला 'अ'सुद्धा आपल्याकडे कोणाला उच्चारायचा नसतो. विशेषत: जुन्या पिढीतल्या लोकांना.

आयुष्यभराच्या झगड्याने तोंड पोळलेल्या या पिढीला आपल्या मुलांच्या वाट्याला हे असले भलते काही येण्याची शक्यतासुद्धा सहन करता येत नाही.

- पण ते हे विसरतात की, पिढी बदलली, तसे आजूबाजूचे वास्तवही बदलले आहेच की।

साध्या टेलिफोनसाठीही दहा दहा वर्षे वाट पाहावी लागायची अशा काळात रखडलेल्या आईबापाची मुले मात्र दहा तासांच्या आत नवा मोबाइल ॲक्टिव्हेट करणाऱ्या काळात जगतात आता।

जग बदलले आहे. या जगाने नव्या संधी आपल्या आहेत.

आपली मुले आता आपल्यासारखी एखाद्या सरकारी खात्यातून तीस-चाळीस वर्षे एकचएक नोकरी करून निवृत्त होणार नाहीत याची जाणीव आईवडिलांना होते, पण ती फार उशिरा!

ते स्वाभाविकही आहे म्हणा।





भविष्य अधुक दिसत असते, तेव्हा माहितीच्या भूतकाळावरले अनुमान वापरून पुढे जावेसे वाटतेच।

हे गणित तोडू शकणारे फार थोडे. अपवादच।

'माझा तुझ्यावर विश्वास आहे, जे करशील ते चांगलेच करशील' - हे एक वाक्य म्हणायला मोठेच धाडस लागते. बहुतांश पालक गोंधळलेल्या आणि भीतीच्या मन:स्थितीतच सतत वावरत असतात. आणि अत्यंत थोडे आपल्या मुलांना जे हवे ते करू देण्यासाठी, निदान एकदा करून बघण्यासाठी आधार देऊ शकतात.

- असे पालक - मोजके असतील पण - आहेत, आणि या नव्या भारतात त्यांची संख्या वाढू लागली आहे।

२०१० साली प्रियदीप सिन्हा एमआयटी मणिपालमध्ये शेवटच्या वर्षाला शिकत होता. बिझनेस प्लॅन बनवण्याच्या एका स्पर्धेत त्याने भाग घेतला.

- प्रियदीपला पहिले बक्षीस मिळाले.

नुसते बक्षीसच नव्हे, तर त्याने सादर केलेल्या प्लॅनमधला बिझिनेस प्रत्यक्ष सुरू करण्याची संधीही मिळाली. त्याच्या कॉलेजच्याच इन्क्युबेटरमध्ये त्याला आपले स्वप्न साकारण्याची-वाढवण्याची-प्रत्यक्षात आणण्याची सोय झाली होती.

कॉलेजमध्ये शिकत असतानाच तो आंत्रप्रनर होणार होता. प्रियदीपने तत्काळ घरी फोन करून त्याच्या वडिलांना ही गोष्ट सांगितली, तेव्हा ते म्हणाले, "हे तुझे आयुष्य आहे. आता तुझे निर्णय तूच घ्यायला हवेत.."

दुसऱ्याच दिवशी प्रियदीपला त्याच्या बँकेच्या खात्यामध्ये दीड लाख रुपये जमा झाले असल्याचे कळले. हे त्याच्या वडिलांनी त्याच्या नव्या बिझिनेससाठी दिलेले स्टार्ट अप कॅपिटल होते. बँकेत काम करणाऱ्या मापससाठी ही मोठीच रक्कम होती.

प्रियदीपच्या डोळ्यात पाणीच आले.

त्याचे स्वप्न सत्यात येण्यासाठी त्याला दहा महिने आधीच बीज भांडवल मिळाले होते.

खरेतर वडिलांकडून मिळालेल्या पैशापेक्षा त्यांनी दिलेले नैतिक पाठबळ हेच त्याच्यासाठी कितीतरी मोठे भांडवल होते.

"माझे आईवडील माझ्यासोबत उभे राहिले, लोक काय म्हणतील याची पर्वा न करता त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला याबद्दल मला किती कृतज्ञ वाटते, हे शब्दात कसे सांगू?"

- प्रियदीप मलाच विचारत होता. खरेच, त्याच्याकडे शब्द नव्हते.

आता प्रियदीपची ग्यान लॅब ही कंपनी मोठी होते आहे. आज त्याच्या कंपनीत पाच पूर्ण वेळ काम करणारे सहकारी आहेत. प्रियदीपच्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल ६५ लाखांवर गेली आहे. आणि त्याच्या व्यवसायात नवी गुंतवणूकही येऊ घातली आहे.

पण प्रियदीपच्या आईवडिलांसारखी उदाहरणे सर्वत्र आहेत असे मात्र नाही. इतकेच नव्हे, तर गुजरातसारख्या 'धंदा आमच्या रक्तामध्येच आहे' असे म्हणणाऱ्यांच्या राज्यातही फारशी वेगळी परिस्थिती नाही.

नोकरी करतच व्यवसाय करणाऱ्या सनी पंड्याने जेव्हा आपल्या व्यवसायाची माहिती आईबाबांना दिली, तेव्हा त्यांना ते अजिबात रुचले नाही.

"आपल्या घराण्यात व्यवसायात आजवर कोणीच यशस्वी झाले नाही, तू कशाला या भानगडीत पडतोस?" - ही नेहमीची ऋचा ऐकवून त्यांनी नोकरीवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला वजा आदेशच सनीला दिला.

- अखेरीस सनीने नोकरी सांभाळून व्यवसाय चालू ठेवण्याचे ठरवल्याने त्यांच्या विरोधाची धार थोडी बोथट झाली, एवढेच।

सनीचा आटापिटा सुरू झाला.

दोन डगरींवर पाय ठेवून चालायचे होते.

या तरुण उद्योजकाने काही प्रोफेशनल्स हायर केले, त्यांना कामे वाटून दिली आणि आपण आपल्या जॉबवर जात राहिला. पण कशालाच वेग येईना. त्याची कंपनी त्याला हवी त्या वेगाने वाढत नव्हती. त्याने ठरवलेल्या दिशेने जाणे तर शक्यच नव्हते.

- आणि सनी कुठेच जीव ओतून काम करू शकत नव्हता.

ना त्याच्या स्वत:च्या कंपनीसाठी, ना तो जिथे नोकरी करत होता त्या कंपनीसाठी।

आपण कुणालाच, कशालाच धड न्याय देत नाही याचा अपराधगंड अखेर सहन होईनासा झाला, तेव्हा आईवडिलांना अंधारात ठेवून त्याने नोकरीचा राजीनामा दिला.

"उनके पीस ऑफ माइण्डके लिए झूठ बोलना पडा, क्या करता मैं? सॉफ्टवेअर इंडस्ट्री क्या होती है उनको मालूमही नही है, और कैसे समझाता मैं?" - सनी विचारतो.

सनीने व्यवसायात पूर्णवेळ लक्ष घातल्यावर मात्र त्याच्या क्विकसन टेक्नॉलॉजी या कंपनीची भरभराट झाली. केवळ १८ महिन्यांच्या कालावधीत कर्मचाऱ्यांची संख्या तीनवरून पंचवीसवर गेली आणि त्या वर्षात त्याने एक कोटी रुपयांचे उत्पन्न कमावले.

- हे यश दिसले, तेव्हा कुठे सनीच्या वडिलांना वाटले की; अच्छा, डिक्रा कुछ अच्छा कर रहा है।

मुलाने त्यांचा विश्वास कमावला आणि त्याच्या यशाबरोबर भविष्याची भीतीही मग गायब झाली.

"उसका बिझिनेस तो अब चल गया है, अगर नही चलता तो भी कुछ ना कुछ ढंग का करही लेगा" - सनीचे वडील आता सांगतात, तेव्हा त्यांच्या स्वरात कौतुक असते, आणि विश्वासही।

गंमत म्हणजे, हाच फंडा सनीने त्याच्या लग्नाच्या बाबतीतही वापरला. दुसऱ्या जातीच्या मुलीवर आपले प्रेम आहे याचा त्याने घरात थांगपत्ता लागू दिला नाही. दोघेही आपापल्या व्यवसायात नीट स्थिरस्थावर होऊन उत्तम कमाई करू लागल्यावरच सनीने आपल्या लग्नाचा विषय घरात काढला.

कोणत्याही अडथळ्याविना त्याचे शुभमंगल झालेच आणि वरून भरभरून आशीर्वादही मिळाले.

"म्हणजे प्रत्येकानेच आपल्या आईवडिलांपासून गोष्टी लपवून ठेवाव्यात असे नाही; मात्र ते फारच हट्टी असतील आणि तुमचा तुमच्यावर विश्वास असेल, तर हे लपविण्याचे तात्पुरते पाप करायला काहीच हरकत नाही" - असे हितेश आज गमतीत सांगतो. ही सगळी मध्यमवर्गातील, सुशिक्षित स्तरातील उदाहरणे झाली. मात्र काही आंत्रप्रनर्स याहून कठीण, गरिबीच्या आणि अभावाच्या पार्श्वभूमीतून येऊन मोठे झालेले आहेत.

अनंद शिरसाट अशाच काही लोकांपैकी एक. त्याचे आईबाबा तर पाथर्डीमध्ये शेती करतात. ते अजिबात शिकलेले नव्हते की त्यांनी कधी लॅपटॉप पाहिला नव्हता. पण त्यांनी अनंदला इंजिनिअर व्हायला आणि नंतर स्वत:चे स्टार्ट अप सुरू करायला पूर्ण पाठिंबा दिला.

अनंद म्हणतो, "मी माझे कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले खरे, पण शिकत असताना काहीतरी वेगळे करण्याचा विचार माझ्या मनात येत असे."

मग त्यानेही या वेगळे काहीतरी करण्याच्या कल्पनेला न्याय दिला. नाशिकमध्येच त्याने ॲरेटे टेक्नॉलॉजी नावाची कंपनी स्थापन केली. यावेळेसही त्याच्या आईबाबांनी त्याला भक्कम साथ दिली. कारण, तो नक्की काय करतो हे त्यांना नीट माहितीही नव्हते.

'काय करतो तुमचा मुलगा?' - असा साचेबंद प्रश्न कुणी विचारला की त्याचे बाबा म्हणतात,

"काहीतरी करतो... टीव्ही, पेपरात असतो सारखा."

(त्याच्या कंपनीची माहिती, त्याची यशोगाथा मीडियामध्ये छापून येते.)

अनंद आपल्या आईबाबांवर भारीच खूश आहे.

ते फार विचार करत नाहीत. त्यांचा आपल्या लेकावर पूर्ण विश्वास आहे, एवढेच।

पालक कमी शिकलेले किंवा निरक्षर असतील, तर मुलांकडून असलेल्या अपेक्षांच्या बाबतीत ते फार आग्रही नसतात. आपण जे करू त्याला पाठिंबा देतात, असा अनंदचा अनुभव आहे.

(रश्मी बन्सल : तरुण भारतीय उद्योजकांच्या प्रेरणादायी कथा सांगणाऱ्या सात पुस्तकांच्या मालिकेच्या लोकप्रिय लेखिका. विद्यार्थिदशेतच उद्योजक होणाऱ्या मुलामुलींच्या प्रवासाचा वेध घेणारे 'अराइज अवेक' हे त्यांचे नवे पुस्तक.)



'स्टार्ट अप'च्या व्हायरसचा प्रवास : लेखांक - २



## Media Featured